# प्रशिक्षण घेणाूया नवीन मेंढपाळांसाठी मार्गदर्शकतत्वे

पौल तीमथ्य अभ्यासाचा उपयोग करण्यास प्रशिक्षणार्थीना साहाय्य करणे.



### ह्या अभ्यास क्रमांचा उपयोग मी कसा करावा?

कृपा करून पवित्र आत्म्याने तुमचे मार्गदर्शन करावे यासाठी काही क्षण प्रार्थना करा.

**1. तुमच्यापेक्षा अधिक अनुभवी पुढाूयांची, मार्गदर्शकाची नियमित भेट घ्या.**

- येशूने व प्रेषितांनी केले त्याप्रमाणेच मार्गदर्शक नवीन पुढायांना प्रशिक्षण देतात. हे प्रशिक्षण वर्गात बसून नाही तर काम करतांना आणि प्रवासात दिले जाते.
- तुमचा मार्गदर्शक लोकांशी कसा वागतो याचे निरिक्षण करा. त्याचेही तुमच्यावर तुम्ही काय करता यावर लक्ष असते.
- पुढील काही आठवड्यातील तुमच्या कामाचे नियोजन आणि विश्वासणायांच्या गरजांनुसार अभ्यासक्रम निवडणे यासाठी तुमच्या मार्गदर्शकाची मदत घ्या. यामुळे प्रभुच्या कार्याचा नवीन भागात विस्तार करण्यास तुम्हांला साहाय्य होईल.
- तुम्ही आणि तुमच्या मंडळीतील लोक काय करीत आहात त्याचा अहवाल मार्गदर्शकाला देत जा. तुमचे अपयश आणि समस्या प्रामाणिकपणे मांडा. तुम्हांला तुमच्या अपयशाची लाज वाटून तुम्ही सत्य दडवून ठेवले तर मार्गदर्शक तुमच्या मदतीला येणार नाही.
- तुमच्या मंडळीत नसलेल्या सेवाकार्याची सुरुवात करण्यास विश्वासणायांना मदत होईल असे अभ्यासक्रम निवडा.
- प्रथम तुम्ही कदाचित तुमच्या मार्गदर्शकाची आठवड्यातून एकदा किंवा दोनदा भेट घ्याल. परंतु त्यानंतर मात्र तुम्ही तीन किंवा चार महिन्यातून एकदा, तुम्हांला गरज भासेल त्याप्रमाणे भेटा.
- आम्ही एकमेकांना बोध करणे (कलस्सै 3:16) आणि आपले अपराध एकमेकांजवळ कबूल करणे (याकोब 5:16) अगत्याचे आहे. याचा अर्थ आम्ही इतर पुढायांचा सल्ला मानतो आणि त्यांनी केलेली सत्यपूर्ण टीका ऐकून घेतो. आमच्या सर्वांवर याप्रकारे देखरेख करणे गरजेचे असते, यात पुढारी एकमेकांचे सेवाकार्य पवित्र शास्त्रानुसार आहे की नाही हे पाहतात, खात्री करून घेतात. या देखरेखीमुळे आमच्यातील नेतृत्व कौशल्यांची वाढ होण्यास मदत होते; तसेच लोकांवर स्वार्थीपणे किंवा दुष्टपणे नियंत्रण ठेवणे टाळले जाते.
- एखादा पुढारी देवाचे काम करीत असेल आणि त्याच्या कामाचे मूल्यमापन करण्यास व सल्ला देण्यास कोणी नसेल तर असा प्रयत्न करणारा पुढारी धोकेबाज मूर्ख म्हटला पाहिजे. यामुळे कित्येक मंडळ्यांचे गंभीर नुकसान होते.

**2. इतर पुढाूयांचीही नियमित भेट घ्या.**

- तुमच्या भागातील इतर पुढायांना भेटा. सर्व पुढायांनी त्यांचे लोक काय करीत आहेत त्याचा अहवाल द्यावा. त्यांना तुमच्या सेवाकार्याचे मूल्यमापन करू द्या. तुम्ही त्यांच्या सेवाकार्याचे मूल्यमापन करा.
- पुढायांनी एकमेकांच्या कामाचे आणि आध्यात्मिक वाढीचे मूल्यमापन करावे. ते एकमेकांना सुधारणा करण्यास मदत करतात. नव्या करारातील आज्ञा आम्हांला एकमेकांना पुढील प्रकारे साहाय्य करण्यास सांगतात–एकमेकांना बोध करणे, एकमेकांना क्षमा करणे, आपल्या चुका एकमेकांजवळ कबूल करणे, एकमेकांची ओझी वाहणे आणि इतर अनेक “एकमेकांच्या संबंधातील” आज्ञा.

- एकमेकांशी प्रामाणिक असणे. एखादी व्यक्ती चुकली तर तिला प्रेमाने चूक सांगून दुरूस्त करा. इतरांनाही तुमच्या चुका दुरूस्त करू द्या. या प्रकारे वाढण्यास पवित्र आत्मा आम्हांला मदत करतो.


### 3. इतर नवीन पुढायांना मार्गदर्शन करा.

- शक्य असेल तितक्या लवकर नवीन मेंढपाळांना मार्गदर्शन करण्यास सुरुवात करा. यापैकी काही सेवक तुम्हांला मंडळीच्या देखभालीमध्ये साहाय्य करतील. ते सहकारी मेंढपाळ उपासनेचे पुढारी व सेवक म्हणून सेवेतील वाटा उचलतील इतर मेंढपाळ नवीन मंडळ्या सुरू करतील किंवा तिथे सेवा करतील.
- ते काय काम करीत आहेत त्यांच्या योजना याविषयी त्यांच्याशी बोला.
- त्यांच्या लोकांच्या सध्याच्या गरजा पूर्ण होतील असे अभ्यासक्रम निवडण्यास त्यांना मदत करा.
- त्यांना गरज आहे तोपर्यंतच अशी मदत करा. 2 तीमथ्य 2:2 मध्ये नवा करार सांगतो की तुम्ही इतर मेढपाळांचे मार्गदर्शन केले पाहिजे. आम्हांला नव्या मेंढपाळांची नावेही सुचवावी लागतील पौलाने तीताला तसे करण्याची सूचना केलेली होती.
- तीत 1:5–9 मध्ये वर्णन केल्याप्रमाणे नव्या मेंढपाळांचा शीलस्वभाव असावा. तो तसा सिद्ध केला पाहिजे. तो सिद्ध करण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांना इतरांची देखभाल करता येते याची खात्री करून घेणे म्हणजेच त्यांना त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाची देखभाल करण्यास सुरुवात करायला सांगणे. त्यांनी तसे केले तर कदाचित ते मंडळीची पाळकीय सेवा करू शकतील.
- काम करण्याची खात्री असेल अशा नवीन मेंढपाळांची नावे सुचवून त्यांना मार्गदर्शन करा. 1 तीमथ्य 3:1–7 ही वचने सांगतात की नुकतीच ख्रिस्ताची ओळख होऊन पालट झालेल्यांची नावे यासाठी सुचवू नका. पौल किती काळ अशी नेमणूक करू नये याबद्दल काही निश्चित वेळ देत नाही. याचे कारण काही विश्वासणारे तीन आठवड्यांत विश्वासात परिपक्व होतात; तर इतरांना याचसाठी तीस वर्षांचा कालावधी लागण्याचीही शक्यता असते. पौलाने स्वतः गलती येथील नवीन मंडळ्यांसाठी मात्र काही आठवड्यातच नव्या पुढायांची नेमणूक केली होती (प्रे. कृ. 14) आणि इकडे अत्युंखियासारख्या जुन्या परिपक्व मंडळीने मात्र पौल व बर्णबा ह्यांच्यावर हात ठेवून त्यांना कामगिरीवर पाठवण्यासाठी एक वर्षभर वाट पाहिली (प्रे. कृ. 11:25–26; 13:1–3).
- इतर पुढायांना मार्गदर्शन करण्यासाठी पुढायांना प्रशिक्षण देणायांसाठी मार्गदर्शकतत्वे वाचा.

### 4. तुमच्या लोकांच्या सध्याच्या आवडी निवडी आणि गरजा ह्यांना योग्य असे अभ्यास भाग आणि कार्यक्रम निवडा.

तुमचे प्रशिक्षक वा समन्वयकांकडून पौल तीमथ्य उपयोग करणायांचा कार्यक्रम मागून घ्या किंवा www.Paul-Timothy.net वरून Download करून घ्या. त्यासाठी *'Download menu'* क्लिक करा *'A printable of Users' menu'* ह्याशिवाय तुमच्या आवडीचा *Format* सिलेक्ट करा (वर दिलेल्या सूचना वाचा).

- प्रार्थनापूर्वक तुमच्या लोकांच्या सध्याच्या गरजा पूर्ण होतील आणि इतरांना सेवेची संधी मिळेल अशा प्रकारे 'उपयोग करणायांच्या कार्यक्रमातून' अभ्यासक्रमांची निवड करा. प्रथम पहिला अभ्यास करायचा आणि मग त्याक्रमाने जायचे असे करू नका.
- तुमच्या लोकांना प्रत्येक आठवड्यात कोणत्या अभ्यासाची आवश्यकता आहे हे तुम्हांला दाखविण्याची विनंती प्रभूला करा. नवजात बालकांसारख्याच नवीन मंडळ्यांच्या गरजा तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता असते. कोणत्याही दोन मंडळ्या परिपक्वतेच्या एकाच मार्गावरून वाटचाल करीत नाहीत.



**सूज्ञ मेंढपाळ त्यांच्या कळपातील मेंढरांचा आवाज 'ऐकणाूया कानांनी' अगदी काळजीपूर्वक ऐकतात.**

- ह्या गरजा आणि संधी जाणून घेण्यासाठी तुमच्या लोकांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून घ्या.
- प्रत्येक सेवाकार्याच्या क्षेत्रासाठी अभ्यासक्रमाचे अनेक भाग आहेत. उदाहरणार्थ "उपासना" ह्या सेवाकार्यात प्रभुभोजन येशूचे पुनरूत्थान साजरे करणे आणि उपासनेचे अन्य पैलू यावरील अभ्यास आहेत.
- प्रत्येक गटामध्ये मेढपाळांसाठी आणि मुलांसाठीचा अभ्यास आहे. दोन्ही अभ्यासक्रमांचा विषय एकच आहे. यामुळे मोठ्या माणसांसमोर सादर करावयाच्या पवित्र शास्त्रातील कथावृत्तांताची तयारी करण्यास मुलांना वेळ मिळतो पवित्र शास्त्रातील कथावृत्तांताचे नाट्यीकरण मुलांना उपासनेच्या दरम्यान मोठ्या माणसांसमोर सादर करता येईल.
- मेंढपाळांसाठीच्या अभ्यासात 'मेंढपाळ' असा शब्द वर नमूद केलेला आहे. ह्या अभ्यासाच्या क्रमांक 'a' या अक्षराने संपतो.
- मुलांसाठीच्या अभ्यासात 'मुलांसाठी' असा शब्द वर नमूद केलेला आहे. ह्या अभ्यासाचा क्रमांक 'b' या अक्षराने संपतो.
- काही भागांमध्ये विषयावरील अतिरिक्त माहितीसह पुरवणी अभ्यासक्रम आहेत.
- नवीन मेंढपाळांच्या प्रत्येक अभ्यासात अनेक कार्यक्रम आहेत. तुम्ही ते सर्व करण्याची आवश्यकता आहे असे नाही.

**5. तुमच्या मंडळीला कोणतीही गोष्ट शिकविण्यापूर्वी वा पुढारीपण करण्यापूर्वी चांगली तयारी करा.**

- किमान आठवडाभर अगोदर तरी चांगली तयारी करण्याची शिस्त तुम्ही स्वत:ला व तुमच्या लोकांना लावा.
- उपासनेच्या पुढ्यांनी मुलांच्या शिक्षकांशी बोलून मुलांना त्यांनी तयार केलेले कार्यक्रम सादर करण्यासाठी व्यवस्था करण्यास सांगा. तसेच त्या आठवड्यातील विषयाला अनुरूप अशी गीते व कार्यक्रमांची निवड करण्यासही उपासनेच्या पुढ्यांना सांगा.
- तुमची मंडळी लहान आहे का? उपासनेसाठी करावयाच्या तयारीकडे दुर्लक्ष करा, विशेषत: लहान मंडळीच्या उपासनेकडे अशा मोहात सैतान मेंढपाळांना टाकतो. मोठ्या मंडळीपेक्षा लहान मंडळीच्या उपासना सभेसाठी अगोदरच पूर्वतयारी करून ठेवणे फार महत्त्वाचे असते. याची चार कारणे आहेत:
  1) लहान मंडळ्यांमध्ये प्रत्येकाला उपासनेमध्ये निरनिराळ्या प्रकारे सहभागी होता येते, नव्या कराराची हीच अपेक्षा आहे. तसेच ही लहान मंडळ्यांची जमेची बाजू आहे. अधिक लोक ख्रिस्ताकडे येतात आणि मोठ्या मंडळ्यांपेक्षा जगातील लहान लहान मंडळ्यांमध्येच राहून त्याची सेवा करतात. आपण वेळेपूर्वी मदतनीस तयार केले नाहीत तर त्यांच्या सहभागाला आपण मुकू. पुढारी सर्व महत्त्वाची कामे स्वत:च करतो. ह्या पापाचे पवित्र आत्म्याला अतिशय दु:ख होते. यामुळे देवाने आम्हांला देखभाल करण्यासाठी दिलेली मंडळी दुबळी दुर्बल होते.
  2) लहान आणि मोठ्या मंडळ्यांमधील लोकांच्या गरजा सारख्याच असतात आणि त्यासाठी प्रार्थनापूर्वक तयारी करणे आवश्यक असते.

3) मोठ्या मंडळ्यांमध्ये पुष्कळदा अनुभवी, चांगले उच्चशिक्षित पाळक पूर्णवेळ सेवा करतात. उपासनेच्या आदल्या दिवशी उपासनेची तयारी करण्याची क्षमता आणि वेळ अशा पाळकांकडे असतो. तथापि, लहान मंडळ्या वेगाने बहुगुणित होतात आणि म्हणूनच त्यांचे मेंढपाळ हे स्वयंसेवक असल्याने अननुभवी व कमी शिकलेले असतात. असे लोक उपासनेच्या आदल्या दिवशीपर्यंत तयारी करण्याची वाट पाहात बसले तर त्यांची तयारी चांगली होणार नाही आणि ते देवाचा आशीर्वाद त्याच्या कळपाकडून हिरावून घेतील.

4) मदतनीसांच्या साहाय्याने प्रार्थनापूर्वक केलेले नियोजन आणि तयारी यावेळीही पवित्र आत्मा सामर्थ्याने कार्य करतो. तो फक्त उपासनेच्या वेळी कार्य करतो असे नाही. अनेक सहकाऱ्यांनी मिळून नवीन पुढाऱ्यांना तयार करण्यासाठी केलेल्या तयारीचा देव उपयोग करून घेतो. येशू आणि पौल ह्यांनी अशीच तयारी केली होती.

## 6. मंडळीचे पुढारीपण करण्यासाठी इतरांबरोबर काम करा.

- सूज्ञ पुढारी एकेकट्याने काम करीत नाहीत. येशू आणि शिष्यांनीही एकट्याने काम केले नाही. उपासनेचे पुढारीपण करण्यासाठी आणि तुमच्या मंडळीची देखभाल करण्यात मदत व्हावी यासाठी इतरांना तयार करा. यातील काही सेवक आठवड्यातील लोकांच्या काही विशेष गरजा असतील तर त्याकडे लक्ष देतील.
- तुम्ही एखाद्याला उपासनेचे पुढारीपण करण्यास तयार केले तर त्यांना पौल तीमथ्य अभ्यास उपासनेचे पुढारी व त्यांचे मदतनीस यांच्यासाठी मार्गदर्शकतत्त्वे वाचायला द्या. A0e
- मुलांच्या शिक्षकांना प्रत्येक आठवड्यात मुलांच्या अभ्यासाची एक प्रत द्या.

## 7. प्रत्येक नवीन मेंढपाळांच्या अभ्यासाचे तीन भाग करा

- तीन भाग असे

  1. आपले अंत:करण व मनाची देवाच्या वचनातून तयारी करा.
  2. पुढील आठवड्यात तुमचे लोक काय करणार याबद्दल तुमच्या सहकाऱ्यांबरोबर नियोजन करा.
  3. आगामी उपासना सभेचे नियोजन सहकाऱ्यांबरोबर करा.

- भाग 1–आपले अंत:करण व मनाची देवाच्या वचनातून तयारी करा.

  प्रत्येक पौल तीमथ्य अभ्यासाचा अभ्यास करण्यास उपासना सभेत बोलण्यापूर्वी, एक किंवा दोन आठवडे आधीच सुरुवात करा. याचा अर्थ समजण्यास वेळ लागतो, यासाठी तुम्हांला तुमच्या लोकांना कशी मदत करता येईल त्याचा विचार करा. तसेच पुढील आठवड्यात याला योग्य अनुरूप असे कार्यक्रम करा.

- भाग 2–पुढील आठवड्यात तुमचे लोक काय करणार याबद्दल तुमच्या सहकाऱ्यांबरोबर नियोजन करा. उपासना सभेच्या अगोदर काही दिवस आधी तुमच्या मदतनीसांची भेट घ्या. उपासना सभेच्या नंतरच्या आठवड्यात तुमचे लोक काय करणार याची योजना आखा. प्रत्येक अभ्यासामध्ये त्यांनी करावयाच्या गोष्टींविषयी सूचना दिलेल्या आहेत. तुमच्या लोकांनी काय करावे याबद्दल देवाची इच्छा तुम्हांला ठाऊक असेल तर मग अर्थपूर्ण उपासना व शिक्षण यासाठी तयारी करणे अधिक सोपे होते.

- भाग 3–आगामी उपासना सभेचे नियोजन सहकाऱ्यांबरोबर करा.

  तुमच्या सहकाऱ्यांनी उपासनेचे नियोजन आणि शिकविणे यासाठी तुम्हांला मदत केली पाहिजे. उपासना सभेचे नियोजन वेळेपूर्वीच करा म्हणजे प्रत्येक सहभागी व्यक्तीला प्रार्थना करून चांगली तयारी करता येईल. कोणी कविता अथवा नाट्यीकरण सादर करणार असेल तर त्यांना सरावासाठी योग्य वेळ द्या. हे अशक्य असेल तर मग उपासनेचे पुढारीपण करणाऱ्यांनी उपासना सभा सुरू होण्यापूर्वी किमान तासभर

आधी एकत्र येऊन प्रार्थना व नियोजन करावे. उपासनेवर काही थोडक्या लोकांचे वर्चस्व राहू नये यासाठी सर्व विश्वासणाऱ्यांना सहजपणे सहभागी होता येईल अशा प्रकारे नियोजन करा.

**8. उपासनेच्या कार्यक्रमांमध्ये मुलांचा समावेश करा.**

- मुलांना उपासना सभेत सहभागी होता यावे यासाठी मुलांच्या शिक्षकांशी बोलून व्यवस्था करा. मुलांच्या अभ्यासात पवित्र शास्त्रातील कथावृत्तांताचे नाट्यीकरण आणि उपासनेमध्ये त्यांनी करावयाचे इतर कार्यक्रम दिले आहेत. शक्य होईल तितके जास्तीत जास्त मोठी माणसे आणि मुलांनी एकत्र काम करावे.
- अद्याप विश्वास ठेवलेल्या शेजाऱ्यांना आणि मुलांना किंवा उपासनेला न येणाऱ्यांना नाटिकेसाठी मदत करायला बोलवा. त्यांना महत्त्वाची भूमिका देऊ नका, कदाचित ते येणार नाहीत. अशा प्रकारे भाग घेणारे लोक बरेचदा ख्रिस्ताकडे येतात.

**9. प्रार्थना करण्यासाठी व एकमेकांना सल्ला देण्यासाठी लहान लहान गट तयार करा.**

- आम्ही एकत्र येतो तेव्हा काही गोष्टी करण्याची देवाची आमच्याकडून अपेक्षा असते. प्रत्येक व्यक्तीचे ऐकता येईल इतपत गट संख्येने लहान असेल तरच ही अपेक्षा पूर्ण होईल.

  देवाची अपेक्षा आहे की आम्ही अनेक प्रकारे एकमेकांची सेवा करावी:

  एकमेकांना बोध करा: रोम 5:14

  एकमेकांना प्रोत्साहन द्या: कलस्सै 3:16; इब्री 10:25

  एकमेकांना बोध करा: इब्री 3:13

  एकमेंकांना प्रीती व सत्कर्मे करण्यास उत्तेजन दया: इब्री 10:24

  एकमेकांची उन्नती (बळकटी देणे, उभारणी करणे) करा: 1 थेस्सल 4:18 व 5:1,11

  एकमेकांजवळ आपली पातके कबूल करा: याकोब 5:16

  एकमेकांसाठी प्रार्थना करा; याकोब 5:16



**आम्ही उपासनेमध्ये लहान गटात एकमेकांना साहाय्य करतो तेव्हा देवाचा पवित्र आत्मा किती सामर्थ्याने कार्य करतो!**

**10. लहान गटाला अनुरूप अशाप्रकारे देवाचे वचन शिकवा आणि उपासना करा.**

- प्रेषित पौलाने सर्वांना उपासनेमध्ये सहभागी होण्यास कळकळीने सांगितले आहे. 1 करिंथ 14:26 मध्ये तो म्हणतो, "तुम्ही उपासनेकरिता एकत्र जमता तेव्हा तुमच्यापैकी प्रत्येक जण, कोणी स्तोत्र गाण्यास कोणी शिक्षण देण्यास, कोणी प्रकटीकरण सांगण्यास, कोणी भाषेतून बोलण्यास तर कोणी तिचा अर्थ सांगण्यास तयार असतो."
- सूज्ञ मेंढपाळ लहान मंडळ्यांसाठी उपदेश करतांना पुलपिटवरून संदेश देण्याची पारंपारिक पद्धत वापरत नाहीत. त्याऐवजी ते अशा पद्धतीने शिकवितात की लोकांना प्रश्न विचारता आणि उत्तरे देता येतील, तसेच ते शिकत असलेल्या देवाच्या वचनातील सत्य गोष्टी कशा आचरणात आणायच्या यावर चर्चा करता येईल.
- पौल तीमथ्य अभ्यासात चर्चेसाठी प्रश्न, कविता, कथावृत्तांत, नाटिका दिलेल्या आहेत यामुळे शिक्षण अधिक प्रभावी होते. कथावृत्तांत लक्षात ठेवायला सोपे जातात आणि त्यातून लोकांपर्यंत देवाचे वचनही पोहंचविता येते.

- उपासनेसाठी खुर्च्या वर्तुळाकार मांडून ठेवा म्हणजे लोकांना एकमेकांचे चेहरे दिसतील आणि त्यांना एकमेकांशी संवाद साधता येईल.
- पौल तीमथ्य अभ्यासामध्ये दिलेल्या सर्व पर्यायांचा उपायोग करण्याचा प्रयत्न करू नका. लोकांच्या आवडी निवडी आणि संस्कृती नुसार पर्याय निवडा.

**11. नियमितपणे प्रभुभोजनाचा विधी करा:**

- नवीन मेंढपाळांच्या प्रत्येक अभ्यासात प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी पवित्र शास्त्रातील विविध उतारे दिलेले आहेत.
- प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी काही मंडळ्या फक्त 1 करिंथ 11 यातील उतारा वाचतात. हा उतारा प्रसंगानुरूप ठराविक वेळीच उपयोगात आणावा; कारण यामध्ये प्रभुभोजनाविषयीची मार्गदर्शकतत्त्वे दिलेली आहेत. तथापि, प्रत्येक वेळी ह्याच उतूायाचा उपयोग केल्याने देवाच्या वचनातील येशूच्या यज्ञार्पणाविषयी अमूल्य आणि प्रेरणादायी माहिती तुमच्या लोकांना मिळत नाही.

**12. देव काय कार्य करीत आहे त्याविषयी उपासनेत तुमच्या लोकांनी अहवाल द्यावा.**

- देवाने कोणाला आरोग्य देऊन बरे केले? विश्वासणूायांनी वाईट सवयींवर विजय मिळवला का? नवीन मंडळ्या सुरू झाल्यात का? नवीन सेवाकार्याची सुरुवात केली आहे का? देवाच्या कार्याविषयी सांगावे आणि याबद्दल त्याची स्तुती करावी.
- लोक जे काम करीत आहेत त्यामुळे त्यांना पुढे सेवा करण्यास उत्तेजन मिळते. यामुळे इतरांनाही प्रार्थना व आणखी कार्य करण्यास प्रोत्साहन मिळते.

**13. आठवड्यात उपासनेच्या दरम्यानच्या कार्यक्रमांची योजना आखा.**

- तुम्ही तुमच्या सहकूायांशी चर्चा करून लोकांसाठी उपासनेदरम्यान करावयाच्या कार्यक्रमांची आखलेली योजना जाहीर करा.
- पुढील आठवड्यात ख्रिस्ताची सेवा कशी करायची याबद्दल लोकांना त्यांच्या कल्पना मांडू द्या.
- ज्यांना सेवा करायची आहे, देवाने त्यांना दिलेल्या आध्यात्मिक कृपादानांचा उपयोग करायचा आहे त्यांना मदत करा, ती कृपादाने अशी:

  सुवार्ता प्रसाराचे कृपादान - इतरांना येशूविषयी सांगा, लूक 24:46-48.

  मदत करण्याचे कृपादान - मदतीची गरज असणूायांची सेवा करा, गलती 5:13.

  पाळकीय सेवेचे कृपादान - देवाचे वचन आचरणात आणण्यासाठी तुमच्या मंडळीला साहाय्य करा, इफिस 5:21-33; 6:1-4.

  सूज्ञतेचे कृपादान - समाजावर देवाचा प्रभाव असावा, मत्तय 5:13-14.

  आस्थेचे कृपादान - गरजूंची सेवा करा, मत्तय 25:31-46.

  उत्तेजन देण्याचे कृपादान - इतरांना खात्री देऊन सांत्वन करा. 1 थेस्सल 5:11.

  आरोग्याचे कृपादान - आजारी व अशुद्ध आत्म्याने पिडलेल्यांसाठी प्रार्थना करा, याकोब 5:13-16.

  नेतृत्व करण्याचे कृपादान - भगिनी मंडळ्यांबरोबर सहकार्य करा. प्रे. कृ. 15:41

  दान देण्याचे कृपादान - गरज असणूाया प्रकल्पांसाठी साधनसामग्री उपलब्ध करून द्या, 1 करिंथ 8:1-4.

## 14. स्त्रिया आणि मुलांना सेवेच्या संधी उपलब्ध करून द्या.

- स्त्रियांनी त्यांना देवाने दिलेल्या अध्यात्मिक कृपादानाचा अवश्य उपयोग करावा. काही संस्कृतींमध्ये सात्विक स्त्रियांना पुरुषांना शिक्षण देण्याची परवानगी असते. प्रिस्किल्लाने अपुल्लोला शिकवले (प्रे. कृ. 18:26). सर्व संस्कृतींमध्ये स्त्रियांनी तरुण स्त्रियांना मार्गदर्शन करणे अगत्याचे आहे (तीत. 2:3-5). मोठ्या मुलांनी लहान मुलांना शिष्यत्त्वाचे प्रशिक्षण द्यावे यासाठी त्यांना प्रोत्साहन द्या. यामुळे दोघांची वाढ होण्यास मदत होईल.
- आठवड्यामध्ये सेवेसाठी एकत्र येणाया स्त्रियांनी किंवा सेविकांनी सेवक सेविका लहान गटाचे पुढारी यांच्यासाठीची मार्गदर्शकतत्वे A0d हा अभ्यास वाचावा.

## 15. तुम्ही नवीन मेंढपाळांचा अभ्यास पूर्ण केल्यावर पुरवणी अभ्यास करा

- नवीन मेंढपाळांचा अभ्यास थोडक्यात आणि साधा आहे, परंतु त्यातून अधिक प्रगत अशा कार्याचा भक्कम पाया घातला जातो. याकडे तुम्ही दुर्लक्ष केल्यास, कालांतराने सेवाकार्यात काही त्रुटी राहतील; त्यामुळे तुमचे सेवाकार्य कमालीचे दुर्बल होईल.
- नवीन मेंढपाळांच्या अभ्यासाशिवाय एखाद्या विषयाचा तुम्हांला तपशीलवार अभ्यास करायचा असेल तर काही विषयांचे पुरवणी अभ्यास तुम्हांला वाचता येतील.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net